अंबरनाथमध्ये जगन्नाथ रथयात्रा...

अंबरनाथ : अंबरनाथ इस्कॉनच्यावतीने शहरात जगन्नाथ रथ यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. पूर्वेकडील ग्रीन सिटी येथून रथ यात्रेचा प्रारंभ झाला व सूर्योदय हॉल येथे त्याचा समारोप झाला. यात भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. छाया : मनोज जगताप.

ईर्शाळगडावर मृत्यूच्या दाढेतून ठाण्याच्या १३ ट्रेकर्सची सुटका

खोपोली शहर : पुढारी वृत्तसेवा

ईर्शाळगडावरून माची प्रबळगडाच्या दिशेने ट्रेकसाठी निघालेल्या ठाण्यातील टीसीएस कंपनीत कार्यरत १३ तरुणांचा गट दाट जंगलात भरकटल्याने रविवारी सायंकाळी मोठी खळबळ उडाली. अंधार गडद होत असताना मोबाईल नेटवर्क पूर्णपणे खंडित, एका बाजूला शेकडो फूट खोल दऱ्या, तर दुसरीकडे निसरडे कातळ अशा जीवधेण्या परिस्थितीत ट्रेकर्स मृत्यूच्या दाढेत अडकल्याची परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, आपत्कालीन ११२ क्रमांकावर मदतीचा कॉल प्राप्त होताच पोलीस, स्थानिक वाटाडे आणि बचाव पथकांनी जीवाची पर्वा न करता राबविलेल्या थरारक मोहिमेत सर्व १३ जणांची सुखरूप सुटका करण्यात आली.

माहितीनुसार, ईर्शाळगडावरून माची प्रबळगडाच्या दिशेने ट्रेक करत असताना हा गट नियोजित वाट सोडून दाट जंगलात भरकटला. सायंकाळ सरत असताना परिसरात अंधार पसरला. मोबाईल नेटवर्क जवळपास बंद झाल्याने मदत मिळण्याची शक्यता कमी झाली होती.

आजूबाजूला खोल दऱ्या, घसरडे कातळ आणि अतिशय धोकादायक पायवाटा असल्याने ट्रेकर्समध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, आपत्कालीन ११२ क्रमांकावर मदतीचा संदेश मिळताच पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट मार्शल-४चे नितीन सोनवणे आणि प्रदीप पोपटे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांच्या समवेत माची प्रबळ गावातील अनुभवी वाटाडे नवनाथ पारधी, हरिश्चंद्र पारधी आणि नथुराम पारधी, पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे तीन अधिकारी व सात पोलीस अंमलदार, निसर्ग मित्र संस्था, पनवेलचे सचिन शिंदे, वरद पवार, हेमंत वैद्य आणि अक्षय देशमुख, तसेच हेल्प फाउंडेशनचे रेस्क्यूअर्स बचाव मोहिमेत सहभागी झाले.या मोहिमेत सुखरूप बचाव करण्यात आलेल्या ट्रेकर्समध्ये आदित्य अशोक विचारे, प्रकाश संतोष सावंत, यतीन कालिया, ऋतुराज सदाशिव पाटील, अंकित मिश्रा, दीपक उत्तम बनकर, अभिषेक जयप्रकाश बहादूरकर, दीपक कुमार राजदेव महतो, अनिकेत दुबे, चेतन शिंदे, राहुल बनकर, प्रशांत पांचोरे आणि रोहित कुमार यांचा समावेश आहे. हे सर्वजण ठाणे येथील टीसीएस कंपनीत कार्यरत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ईर्शाळगड परिसरातील दाट जंगलात भरकटलेल्या या १३ ट्रेकर्सना शोधून बचाव पथकाने सुरक्षित बाहेर काढले. (छाया : दिलीप पवार)

रात्र वाढत असताना दाट जंगलातून ट्रेकर्सचा शोध घेणे हे मोठे आव्हान ठरले. अनेक ठिकाणी एका चुकीच्या पावलाने शेकडो फूट खोल दरीत कोसळण्याचा धोका होता. तरीही बचाव पथकाने जीव धोक्यात घालून शोधमोहीम सुरू ठेवली. अनेक तासांच्या अथक प्रयत्नांनंतर भरकटलेल्या ट्रेकर्सपर्यंत पोहोचण्यात यश आले. त्यानंतर त्यांना सुरक्षित मार्गाने एकामागोमाग एक खाली आणण्यात आले. पनवेल तालुका पोलीस, स्थानिक वाटाडे, निसर्ग मित्र संस्था आणि हेल्प फाउंडेशनच्या रेस्क्यूअर्सनी जीवाची पर्वा न करता राबविलेल्या या धाडसी संयुक्त बचाव मोहिमेचे कौतुक होत आहे.

कारागृहात कैद्याला बेदम मारहाण

दोघा पोलीस कर्मचाऱ्यांवर मारहाणीचा आरोप

डोंबिवली : पुढारी वृत्तसेवा

बदलापूर येथील एका प्रकरणात अटकेत असलेल्या तरुणाला कल्याणच्या आधारवाडी कारागृहात दोघा पोलीस कर्मचाऱ्यांनी बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मारहाणीचे कारण समजू शकले नाही. मात्र या मारहाणीत सदर तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर मुंबईतील सर. जे.जे. रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, बदलापूर येथील गुन्ह्यात अटक करण्यात आलेला अक्षय कुरतडकर हा तरुण सध्या कल्याणच्या आधारवाडी कारागृहात बंद आहे. तो आंधोळ करून बॅरेकच्या दिशेने परत येत असताना तेथील दोघा पोलीस कर्मचाऱ्यांनी अडवून त्याला मारहाण केल्याचा आरोप आहे. या मारहाणीत अक्षय गंभीर जखमी झाला. त्याच्या पायाला १६ टाके पडले असून पुढील उपचारासाठी मुंबईच्या सर जे. जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी अक्षयची मावशी उज्वला आचरेकर यांनी संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

एसआयआर बीएलओ शिक्षकांच्या न्यायासाठी उच्च न्यायालयात धाव

शिक्षकांवरील अमानुष कामाचा भार, धमक्या आणि मानसिक छळाविरोधात संघटनेचे जाहीर आवाहन

वागळे : पुढारी वृत्तसेवा

एसआयआर अंतर्गत बीएलओ (मतदार नोंदणी अधिकारी) व बीएलओ पर्यवेक्षक म्हणून कार्यरत शिक्षकांवर वाढता कामाचा ताण, मानसिक छळ, धमक्या आणि मानवी हक्कांचे होत असलेले उल्लंघन याविरोधात महाराष्ट्र राज्य शिक्षण क्रांती संघटनेने मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. या याचिकेत सहभागी होण्यासाठी राज्यभरातील बाधित शिक्षकांना संघटनेने जाहीर आवाहन केले आहे.

संघटनेचे राज्याध्यक्ष सुधीर घागस यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले की, अनेक शिक्षकांना एक हजार ते दीड हजारांहून अधिक गणना नमुने (एन्युमरेशन फॉर्म) देण्यात आले असून एवढ्या मोठ्या कामाचा भार अल्प मुदतीत पूर्ण करणे अशक्य होत आहे.

काम पूर्ण न झाल्यास निवडणूक विभागाकडून गुन्हा दाखल (एफआयआर) करण्याच्या धमक्या, मानसिक दबाव तसेच अवमानकारक वागणूक दिली जात असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर समोर येत आहेत. शिक्षकांचे वैयक्तिक भ्रमणध्वनी क्रमांक मतदारांना दिल्यामुळे सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत सतत दूरध्वनी आणि संदेश येत असून त्यांच्या वैयक्तिक व कौटुंबिक जीवनावर विपरीत परिणाम होत असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

गर्भवती महिला शिक्षक, स्तनपान करणाऱ्या माता, गंभीर आजारांनी ग्रस्त शिक्षक तसेच अपरिचित भागात घरभेटी देणाऱ्या महिला शिक्षकांच्या सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याशिवाय रविवार, सार्वजनिक सुट्ट्या आणि शालेय वेळेनंतरही काम करून घेतले जात असून त्याबदल्यात ना बदली रजा दिली जात आहे, ना पुरेसे मानधन. प्रवास, भ्रमणध्वनी व इतर खर्चही शिक्षकांनाच स्वतःच्या खिशातून करावे लागत असल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या अतिरिक्त जबाबदाऱ्यांमुळे विद्यार्थ्यांच्या अध्यापनावरही परिणाम होत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

शिक्षकांचा सन्मान, शिक्षकांचा अधिकार आणि शिक्षकांचा न्याय यासाठी सर्व शिक्षकांनी एकत्र यावे. या लढ्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शिक्षकांनी आपल्या तक्रारी महाराष्ट्र राज्य शिक्षण क्रांती संघटनेचे राज्याध्यक्ष सुधीर घागस यांच्या नावे सादर कराव्यात, असे आवाहन त्यांनी केले आहे.

'लिव्ह-इन'चे आमिष, ५७ लाखांवर डल्ला !

डोंबिवली : पुढारी वृत्तसेवा

डोंबिवलीमध्ये लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहण्याचे प्रलोभन दाखवून एका ७३ वर्षीय ज्येष्ठ महिलेची तब्बल ५७ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अनुज संतोष तिवारी उर्फ अजुनकुमार चंद्रप्रकाश त्रिवेदी उर्फ अनुजसिंग संतोष सिंग अग्रवाल असे वेगवेगळी नावे धारण करून अडल्या/नडल्या महिलांची फसवणूक करणाऱ्या ४८ वर्षीय बदमाशाचे नाव आहे. डोंबिवलीत राहणाऱ्या ७३ वर्षीय वृद्ध महिलेने आयुष्याच्या उत्तरार्धात सोबती मिळावा, यासाठी एका मॅट्रिमोनियल संकेतस्थळावर नाव नोंदविले होते. तिथे तिची ओळख या भामट्याशी झाली. त्याने वृद्धेशी गोड बोलून एकत्र राहण्याचे आमिष दाखविले. त्यानंतर विविध घरगुती आणि वैद्यकीय कारणे सांगून तिच्याकडून टप्प्याटप्प्याने तब्बल ५७ लाख रुपये उकळले.

बदलापुरात गोळी लागून तरुण ठार

बदलापूर : पुढारी वृत्तसेवा

बदलापूरजवळील सागाव येथे शनिवारी रात्री घडलेल्या धक्कादायक घटनेत छातीत गोळी लागून २३ वर्षीय भुवन कृष्णा पाटील याचा मृत्यू झाला. फार्महाऊस परिसरातील क्रिकेट टर्फवर ही घटना घडल्याने संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली असून, हा मृत्यू आत्महत्या, अपघात की घातपात, याचा सर्वंकष तपास ग्रामीण पोलिसांकडून सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भुवन कृष्णा पाटील याचे सागाव येथे स्वतःचे क्रिकेट टर्फ असून, शनिवारी रात्री तो नेहमीप्रमाणे टर्फ परिसरात होता. त्याचदरम्यान त्याच्या छातीत गोळी लागली. गोळी लागल्याने त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. काही वेळाने त्याचा मृतदेह फार्महाऊसच्या लॉनमध्ये रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अवस्थेत आढळून आला. ही बाब समोर येताच परिसरात मोठी खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच ग्रामीण पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

पोलिसांनी परिसराचा पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला आणि शवविच्छेदनासाठी पाठविला. तसेच घटनास्थळावरील पुरावे गोळा करण्याचे कामही सुरू करण्यात आले आहे. या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. भुवन पाटील याने स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली का, त्याच्याकडून चुकून गोळीबार झाला का, अथवा हा घातपाताचा प्रकार आहे का, या सर्व शक्यतांचा तपास सुरू असल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी ढवळे यांनी दिली.

या घटनेने सागाव आणि बदलापूर परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, पोलिसांच्या तपासानंतरच मृत्यूमागील नेमके कारण स्पष्ट होणार आहे. सध्या ग्रामीण पोलीस सर्व बाजूंनी तपास करत असून, घटनास्थळावरील पुरावे, प्रत्यक्षदर्शींची माहिती आणि अन्य तांत्रिक बाबींची पडताळणी सुरू आहे.

सार्वजनिक सूचना
सर्व संबंधितांच्या निदर्शनास

याद्वारे सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की **मेसर्स एम ए के लिव्हिंग इन्फ्रा एनएलएलपी** यांना गट क्र. ७७, ७९/२, १३५, १३६, १३७, १३८/२, १४२, १४३ व १४४, मौजे सरळ, ता. अलिबाग, जि. रायगड, महाराष्ट्र येथे प्रस्तावित निवासी व व्यावसायिक इमारत प्रकल्पासाठी पर्यावरणीय मंजुरी (Environmental Clearance) प्राप्त झाली आहे.

ही पर्यावरणीय मंजुरी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व हवामान बदल विभागामार्फत, ऑल्फा क्रमांक EC26C3801MH5560992N, फाइल क्रमांक SIA/MH/INFRA2/576761/2026 दिनांक **१७/०७/२०२६** रोजी प्रदान करण्यात आली आहे.

सदर पर्यावरणीय मंजुरी पत्राची प्रत भारत सरकारच्या पर्यावरण वन व हवामान बदल मंत्रालयाच्या (MoEF&CC) PARIVESH संकेतस्थळावर https://parivesh.nic.in येथे उपलब्ध आहे.

मेसर्स एम ए के लिव्हिंग इन्फ्रा एनएलएलपी साठी
नोंदणीकृत कार्यालय:
४३, मित्तल कोर्ट बी. बॅरेस्टर रजनी पटेल रोड, नरिमन पॉइंट. मुंबई . ४०००२१

जा.क्र. ४२५६/२६ दिनांक: १६/०७/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई
१ ला मजला, सास्मिरा बिल्डींग, सास्मिरा रोड,
वरळी, मुंबई- ४०० ०३०.

जाहिर सूचना

अर्ज क्रमांक :- ३६/२०२४, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अन्वये, कलम ४७ खालील नमुद न्यासात विश्वस्तांची नेमणूक करणे करिता.

न्यासाचे नाव :- "Agarwal Seva Samiti"
न्यास नोंदणी क्रं :- E-4501 (Thane)

१. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ४७ अन्वये दाखल अर्ज क्रमांक **३६/२०२४** मधील निशाणी क्रमांक १ खाली मा. धर्मादाय सह आयुक्त, बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांनी दिनांक १५.०६.२०२६ रोजी पारित केलेल्या आदेशान्वये सर्व संबंधित हितसंबंध लोकांना या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, **"Agarwal Seva Samiti"** या न्यासात अर्जदार Mukesh Bajranglal Gupta यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. "Agarwal Seva Samiti" न्यास नोंदणी क्रमांक:- **E-4501 (Thane)** या न्यासाच्या नोंदणीच्या वेळी व्यवस्थापन पाहणारे खालील नमुद विश्वस्त होते. त्यापैकी दोन विश्वस्त मयत आहेत व तीन विश्वस्त उपलब्ध नाहीत असे अर्जदारांनी निशाणी क्र. १ मध्ये म्हटले आहे. सदर विश्वस्तांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

1. Shri. Mahavirprasad Motilal Beswal 345, Kasar Ali, Shridevi Apartment, Room No.3, Ground Floor, Gokul Nagar, Bhiwandi.
2. Shri. Radheshyam Mahavirprasad Beswal Room no 1, 1st Floor, Sanjog So., Gokul Nagar, Bhiwandi.
3. Shri. Hanumanprasad Banarasilal Agarwal 4B/15, 3rd floor, flat no. 303//304, Gokul Nagar, Bhiwandi.
4. Shri. Rambabu Banwarilal Agarwal 202/203, Sheetal Apartment, 722, Gauri Pada, Opp Telephone Exchange, Bhiwandi.
5. Shri. Prakash Bhawarlal Mittal A/5, Jalaram So., Gokul Nagar, Kasar Ali, Bhiwandi.
6. Shri. Navaranglal Ramnarayan Bazari 602, Neminath Darshan, Bhagwan Mahaveer Rd., Gokul Nagar, Biwandi.
7. Shri. Attal Bihari Tarachand Khaitan C-301, Murli Palace, Gokul Nagar, Bhiwandi.
8. Shri. Nitin Gaurishankar Agarwal 10A/303, Gopal Nagar, Bhiwandi.
9. Shri. Santkumar Mahavirprasad Modi 229, Dev Ashish Building, College Rd., Dhamankar Naka, Bhiwandi.
10. Shri. Sureshkumar Ganeshmal Agarwal 1/11, Ashapura Hsg. So., 3rd floor, 83, Mharwada, Gokul Nagar, Bhiwandi.
11. Shri. Mukesh Bajranglal 384, Dev Ashish So., A 6, 2nd floor, Gokul Nagar, Bhiwandi.

३. प्रस्तुतचे प्रकरण अर्ज क्रमांक **३६/२०२४** मध्ये न्यासात "विश्वस्त" म्हणून नेमणूक करण्यासाठी खालील व्यक्तींनी विनंती केलेली आहे.

1. Mukesh Bajranglal Gupta Flat No 2502, Rodas Enclave, Basilus Building, Hiranandani Estate, Thane (West)
2. Nitin Gaurishankar Agarwal 1202, Woodrose, Hirsnandani medows Thane (West)
3. Nand Kishore Lal Chand Agarwal 602 Annora Rodas Enclave, Hiranandani Estate, Patlipada, Thane (West) 400607
4. Subhash Jagdishprasad Agarwal 1001, Celio Chs, Gladys Alwaresroad, Hiranandani Meadows, Thane (West)-400607
5. Pravin Kumar Harchandrai Agarwal Bldg 23/B Ashok Nagar, Kalyan Road, Bhiwandi, Thane (West)
6. Gaurishankar Bagicharam Agarwal 1201 Woodrose Hiranandani Meedows Thane (West)
7. Dilliip Bhanwarlal Agarwaal 803,B-Wing, Aspen Bldg, Raheja Garden, Thane (West)
8. Ganesh Mohan Lal Choudhary 403, B-Wing, Aspenbldgraheja Garden, Thane (West)
9. Ajit Damodar Chhaparia 404/A, Crystal Spires, Soham Gardens Manpada, Thane (West) - 400607
10. Sanjay Jagdishprasad Tulshyan A1404 Vikash Complex Castle Mill Naka Thane (West)
11. Hanuman Prasad Banarasidas Agarwal 1401/1402, B Wing, Lavinia Chs Hiranandani Estate Patlipada, Thane (West) 400607
12. Mahesh Kumar Birdhi Chand Mittal T/1/1at No 701 Flower Valley Thane (West)
13. Satish Shree Kishan Agarwal 1503 Victoria, Lodha Paradise Nasik Road, Thane (West)
14. Ashokkumar Hanumanprasad Agarwal C-904, Siverleaf Residency, Kamatghar Road, Anjuphata, Bhiwandi
15. Manoj Bhanwarlal Agarwal Flat No.134, Rozanne Courtyyard, Pokhran Road No.2, Near Baithany Hospital, Opp Glaxo Smith Kline,Majiwada, Thane - 400610.

४. प्रस्तुतचे प्रकरण, वर नमुद न्यासात विश्वस्तपदी नेमणुक करण्यासाठी मा. धर्मादाय सह आयुक्त, बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांचे समोर दिनांक **२९/०८/२०२६** रोजी सकाळी **११.००** वाजता ठेवले आहे.

५. त्याअर्थी कोणी व्यक्ती सदर न्यासाचे विश्वस्त होण्यास इच्छुक असल्यास त्यांनी आपल्या स्वयं माहिती सहीत (Biodata) अर्ज वर नमूद कार्यालयाच्या पत्त्यावर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत सादर करण्यात यावे.

६. त्याअर्थी वरील विश्वस्त नेमणूकीबाबत कोणाला काही हरकती/आक्षेप किंवा काही सांगावायचे असल्यास त्यांनी वर नमूद कार्यालयाच्या पत्त्यावर प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत सादर करण्यात यावे.

७. उपरोक्त प्रमाणे अर्ज अथवा हरकत प्राप्त न झाल्यास कायदयानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, याबाबत नोंद घ्यावी.

सदर सूचना माझे सही व मा. धर्मादाय सह आयुक्त, बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांचे शिक्यानिशी आज दिनांक १६/०७/२०२६ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक (न्याय),
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई

बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda

पोवई शाखा : अल्फा इमारत, हिरानंदानी गार्डन, पोवई, मुंबई-४०००७६, भारत

जाहीर सूचना

सर्वसाधारण लोकांना माहिती देण्यात येते की बँक ऑफ बडोदा पोवई शाखा, मुंबई, ४०००७६ हे खाली नमूद करण्यात आलेली मालमत्ता, जी खाली दिलेल्या परिशिष्टात नमूद असलेल्या नावावर आणि पत्त्यावर उभी आहे, सदर ग्राहकांकडून विनंती करण्यात आलेल्या कर्ज/क्रेडीट सुविधेसाठी तारण म्हणून स्वीकारू इच्छित आहे.

खाली नमूद मालमत्ते/तांसदर्भात कुणाचे काही हक्क/मालकीहक्क/हितसंबंध/दावे असतील तर त्यांना सल्ला देण्यात येतो की त्यांनी १० दिवसांमध्ये त्यांच्या दाव्याच्या पुष्टयर्थ आवश्यक पुराव्यांसहीत बँकेशी संपर्क साधावा.

जर १० दिवसांमध्ये कोणताही प्रतिसाद आला नाही तर, असे समजण्यात येईल की ही/या मालमत्ता कोणत्याही प्रकारच्या चार्ज/दावा/भार यापासून मुक्त आहे आही बँक खाली नमूद कर्जदारासाठी गहाणखत जारी करण्याची प्रक्रिया पूर्ण करेल (गहाणखतात नमूद शर्ती आणि अटींनुसार)

कर्जदाराचे नाव	कर्जदाराचा पत्ता	मालमत्तेचा पत्ता
मे. ड्रीमॅक्स डेवलपर्स प्रायव्हेट लिमिटेड मालमत्ता श्री. विजय लालताप्रसाद यादव आणि सौ. साक्षी विजय यादव यांच्या मालकीची	९०१ आणि ९०२, सीटीसी क्र. ७२०/४२-४६, क्लिंटर रोडला, ओशिवारा गाव, क्लिंटर रोडला, न्यू लिंक रोडच्या बाजूला, अंधेरी पश्चिम, अंधेरी, मुंबई-४०००५३ महाराष्ट्र	फ्लॅट क्र. १४०१, १४वा मजला, मोजमाप २१०९ चौ.फू. +७४१ चौ. फू. एकूण २८५० चौ. फू. (कार्पेट क्षेत्र), ५ पार्किंग जागांसहीत क्र. बी-४८ आणि ४९, एस-३५,३६ आणि ३७, ''शिखर'' नावाच्या इमारतीत, जी आदर्श नगर क्र. १, न्यू लिंक रोड, ओशिवारा, जोगेश्वरी (प), सर्वे क्र. ४१ (भाग), सीटीएस क्र. १ (भाग), गाव-ओशिवारा, तालुका-अंधेरी, जिल्हा-मुंबई ४०००१२ येथे स्थित

शाखा तपशील/संपर्क क्र.
शाखा नाव : पोवई शाखा
संपर्क क्र. : ८६५२६३९६२०
शाखा प्रमुख : रूपेश कुमार गुप्ता

वकिलांचे नाव आणि मोबाईल क्र. :
दास असोसिएट्स (ॲड. प्रसाद दास)
संपर्क क्र. : ९८२०० ०९४८९

जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (अवसायनात)
नोंदणीकृत कार्यालय - स्टर्लिंग सेंटर, ४०१-४०७, ४था मजला, डिडवाईन चाईल्ड हायस्कूल समोर, अंधेरी कुर्ला रोड, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई महा. ४०००९३
सीआयएन: L99999MH1992PLC066213
(कंपनी अवसायन प्रक्रियेत आहे पहा माननीय एनसीएलटी यांचा आदेश दिनांक नोव्हेंबर २६, २०२४)

ई-लिलावासाठी जाहीर घोषणा

नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ आणि त्याअंतर्गत असलेल्या नियमांनुसार सूचना

खाली स्वाक्षरी करणारे हे सर्वसामान्य लोकांना इथे सूचना देत आहेत की जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (अवसायनात) (**''कॉर्पोरेट कर्जदार''**)च्या मालकीच्या दहा (१०) मालमत्तांच्या (खाली दिलेल्या तक्त्यात वर्णन असलेल्या) विक्रीसाठी प्रस्ताव मागण्यात येत आहेत, या मालमत्ता कॉर्पोरेट कर्जदाराच्या अवसायनातील संपत्तीचा नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ (**''आयबीसी''**) च्या तरतुदींनुसार तसेच त्याअंतर्गत नियम आणि रेग्युलेशन्सचा भाग असून 'जे आहे जिथे आहे,' 'जे काही आहे तेथे आहे' आणि 'कोणत्याही मदतीशिवाय' आधारावर आणि कोणतेही प्रतिनिधित्व, वॉरंटी किंवा कृपसनभरपाईशिवाय त्यांची विक्री होईल.

खाली स्वाक्षरी करणारे यांच्याद्वारे ही विक्री ई-लिलाव प्लॅटफॉर्म बांकेनट (पूर्वीचे ईबिक्रे) च्या माध्यमातून https://ibbi.baanknet.com (**ई-लिलाव प्लॅटफॉर्म**) आयबीबीआय (दिवाळखोरी प्रक्रिया) नियम, २०१६ चा नियम ३२ आणि मालमत्ता विक्री प्रक्रिया करार दिनांक जुलै २०, २०२६ (**''एसपीएपीएए''**) नुसार होणार आहे. सर्व इच्छुक बिडर्सना विनंती आहे की त्यांनी सर्व पात्रता निकष दस्तावेज आणि बयाणा रक्कम हे संबंधित एएसपीएसच्या कलम ४ (पात्रता निकष दस्तावेज) मध्ये नमूद करण्याच्या आलेल्या दस्तावेज प्रस्तुती नियमांनुसार अनिवार्यपणे, आणि केवळ ई-लिलाव प्लॅटफॉर्मवरच प्रस्तुत करावेत.

ई-लिलावाच्या महत्वाच्या दिनांकांचे वेळापत्रक	
पात्रता निकष दस्तावेज आणि कलम २९अ हमीपत्र ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर प्रस्तुत करण्याचा अंतिम दिनांक आणि वेळ	मंगळवार, ऑगस्ट ४, २०२६, सायं. ५.०० (युटीसी+५.३०)
बयाणा रक्कम (**''ईएमडी''**) ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर प्रस्तुत करण्याचा अंतिम दिनांक आणि वेळ	मंगळवार, ऑगस्ट ४, २०२६, सायं. ५.३० (युटीसी+५.३०)
ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ	शुक्रवार, ऑगस्ट ७,२०२६ दुपारी १२.०० ते सायं. ६.०० (युटीसी+५.३०)
अंतिम विक्रीचे मूल्य भरण्याचा अंतिम दिनांक	खाली स्वाक्षरी करणारे यांच्याद्वारे अंतिम विक्री मूल्य भरण्याची मागणी करणारे पत्र जारी केल्याच्या साठ (६०) दिवसांमध्ये

रक्कम भारतीय रुपयांत

अनु. क्र.	मालमत्ता वर्णन	मालमत्ता आयडी	लिलाव आयडी	राखीव मूल्य*	बयाणा रक्कम (ईएमडी)	वाढीव मूल्य
१	मारूती सुझुकी-SX4 VDI DL3CBU5685	३०५९	४२००	१,२७,५४०	१२,७४४	६,३९७
२	मारूती सुझुकी-EECO Green 5Seater DL2CAQ4409	३०६१	४२०१	१,०८,९१३	१०,८९१	५,४४६
३	होंडा सिटी १.५ SV MT (i-VTEC)MH02EE0955	३०६३	४२०२	२,७७,५३०	२७,७५३	१३,८७७
४	होंडा सिटी १.५ SV MT (i-VTEC)MH02EE0961	३०६४	४२०३	२,७७,५३०	२७,७५३	१३,८७७
५	मारूती सुझुकी- स्विफ्ट डिझायर VXI BS IV MH02EK5147	३०६५	४२०४	२,५१,६१५	२५,१६२	१२,५८१
६	होंडा सिटी १.५ SV MT (i-VTEC)MH02EE0950	३०६६	४२०५	२,७७,५३०	२७,७५३	१३,८७७
७	मारूती सुझुकी- स्विफ्ट डिझायर VXI BS IV MH02EK5144	३०६७	४२०६	२,५१,६१५	२५,१६२	१२,५८१
८	होंडा सिटी १.५ SV MT (i-VTEC)MH02EK4299	३०६८	४२०७	३,२६,०८२	३२,६०८	१६,३०४
९	मारूती सुझुकी- स्विफ्ट डिझायर VXI MH02EK5146	३०६९	४२०८	२,५१,६१५	२५,१६२	१२,५८१
१०	ऑडी A६ ३५TFS DL3CCN6403	३०५७	४२०९	१४,२२,०९७	१,४२,२१०	७१,१०५

ठिकाण : खसरा क्र. ११४०-४२, लुधरा इस्टेट, राजोकरी, नवी दिल्ली, दिल्ली ११००३८, भारत

*किंमत पूर्ण होण्यासाठी लागणारे कर, अधिभार, चार्जेस, ड्युटीज, हस्तांतरण शुल्क, स्टँप ड्युटी, नोंदणी शुल्क, प्रिमियम आणि इतर सर्व लागू खर्च वगळून सर्व दर असून, त्याबाबत संबंधित एसएसपीएमच्या कलम १९ मध्ये (मूल्य, खर्च आणि कर परिणाम) नमूद केल्याप्रमाणे खरेदीदाराने भरायचे आहेत. खाली स्वाक्षरी करणारे किंवा नुकसानभरपाईपात्र पक्ष हे कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधित्व, हमी किंवा नुकसानभरपाई देत नाहीत (संबंधित एएसपीएमच्या नमूद केल्याप्रमाणे)

महत्वाच्या सूचना

१. दहा (१०) मालमत्तांसाठी दहा (१०) स्वतंत्र ई-लिलाव बांकेनट पोर्टलवर उपलब्ध आहेत.
२. ही विक्री सूचना संबंधित एएसपीएमसहीत वाचावी, ज्यात मालमत्तांचे तपशील, ड्यूपोषणा, प्रतिज्ञापत्रे आणि आयबीसीच्या कलम २९ए अंतर्गत पात्रतेसाठी आवश्यक हमीपत्रे आणि ई-लिलावाच्या 'सर्वसाधारण आणि तांत्रिक अटी व शर्ती' बांकेनटवर https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/auc-listing वर संबंधित मालमत्तेच्या मालमत्ता आयडी आणि लिलाव आयडी उपलब्ध आहेत, किंवा कॉर्पोरेट कर्जदार यांच्या संकेतस्थळावर www.jetairways.com वर उपलब्ध आहेत.
३. इच्छुक बिडर्सनी संबंधित एएसपीएममधील कलम ४ (पात्रता निकष दस्तावेज) नुसार, निश्चित केलेल्या कालमर्यादेत, आवश्यक पात्रता दस्तावेज आणि बयाणा रक्कम (ईएमडी) केवळ आणि केवळ ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारेच प्रस्तुत करावेत, थेट अवसायकाकडे प्रस्तुत करू नयेत.
४. ई-लिलाव प्लॅटफॉर्म आणि दस्तावेज आणि बयाणा रक्कम प्रस्तुत करण्यासंबंधी काही चौकशी करायची असेल, तर इच्छुक बिडर्सनी बांकेनट ला +९१ ८२९१२२०२२० आणि support.baanknet@psballiance.com वर संपर्क करावा.
५. ई-लिलावासंदर्भात कोणतीही चौकशी कराची असेल तर अवसायक यांचे अधिकृत प्रतिनिधी श्री. दर्शील मसरू (+९१ ९५९४५५२९४) यांच्याशी, jetliquidation@in.ey.com आणि liquidation.jet@gmail.com वर 'जेट एअरवेज-दिल्ली सेटर्कलमेंट' असा विषय नमूद करून संपर्क साधावा. कृपया नोंद घ्या, पात्रता किंवा बोलीशी निगडीत कोणतेही दस्तावेज अवसायक, त्यांचे प्रतिनिधी किंवा त्यांचे सल्लागार यांच्याकडे प्रस्तुत करायची नाहीत.
६. इथे स्पष्ट करण्यात येते की ही सूचना खाली स्वाक्षरी करणारे किंवा जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (अवसायनात) यांच्यावर विक्री पूर्ण करण्याचे कोणतेही बंधन निर्माण करत नाही. खाली स्वाक्षरी करणारे यांनी सीआयबी यांच्याव्यतिरिक्त घेतलेले कोणताही निर्णय अंतिम असेल आणि तो सर्व इच्छुक बिडर्सवर बंधनकारक असेल.
७. इथे स्पष्ट करण्यात येते की इथे नमूद करण्यात आलेले आणि संबंधित एएसपीएममध्ये नमूद करण्यात आलेले मालमत्तांचे तपशील हे केवळ सामान्य संदर्भासाठीच आहेत. नुकसानभरपाईपात्र पक्ष (संबंधित एएसपीएममध्ये नमूद केल्याप्रमाणे) हे स्पष्टपणे मालमत्तांचा वर्णनात/स्थितीत असलेल्या कोणत्याही वैगुण्य/चुक/विसंगती/च